**ePaper** मद्यघोटाळ्याचा पैसा निवडणुकीत; केजरीवाल यांच्यावर 'ईडी'चा आरोप, 28 मार्चपर्यंत कोठडी

| वर्ष - 7 । अंक - 304 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- चेन्नई सुपर किंग्सची विजयी सलामी
- उर्वशी राजकारणात करणार एन्ट्री?
- मोदींचीही झाली होती ईडी चौकशी
- बोट धरून राजकारणात आले असते तर

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 23 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# ‘नवी दिशा’तून महिला सबलीकरणाची ‘सिद्धी’

## » महिला सक्षमीकरणासाठी महापालिका समाज विकास विभागातर्फे विविध उपक्रम

।पिंपरी । महाईन्यूज

**महिला सबलीकरण व सक्षमीकरणासाठी महापालिका समाज विकास विभागातर्फे विविध उपक्रम राबवत आहे. त्यात ‘सक्षमा’, ‘नवी दिशा’ ‘कौशल्यम्’, लाइट हाऊस’, ‘सिद्धी’ आदी प्रकल्पांचा समावेश आहे. बचत गटांच्या माध्यमातून स्वरोजगार निर्मिती ते मिळकतकर बिलांच्या वितरणापर्यंतची जबाबदारी महिला पार पाडत आहेत.**

शहरातील महिला बचत गटांना महापालिकेच्या उपक्रमांमध्ये सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने ‘नवी दिशा’ प्रकल्प प्रभावी ठरत आहे. यामध्ये बचतगटांद्वारे शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची देखभाल करण्याचे काम केले जात आहे. तसेच, महापालिका सिद्धी प्रकल्प राबवत आहे. त्यामध्ये मिळकतकर बिलांचे वाटप बचत गटांद्वारे केले आहे. त्यामुळे बचत गटांच्या सहभागामुळे महापालिकेने तीन ते चार महिन्यांमध्ये ४४० कोटींपेक्षा जास्त मिळकतकर वसूल केला आहे, असे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले. कौशल्यम हा एक सहयोगी प्रकल्प आहे. यामुळे तरुणांच्या आकांक्षा आणि उद्योगाची मागणी यांच्यातील अंतर कमी करण्याचा प्रयत्न आहे. कौशल्यम हे शहरातील तरुणांना सशक्त बनविण्याच्या आणि शाश्वत आर्थिक विकासाला चालना देण्याच्या वाटचालीतील महत्त्वाचे पाऊल आहे. शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी लागणाऱ्या सामूहिक कृतीचे महत्त्व अधोरेखित करणारा हा सहकार्यात्मक प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगितले.





“ महिला सक्षमीकरणासाठी महापालिकेच्या समाज विकास विभागाने सक्षमा प्रकल्प सुरू केला आहे. त्याअंतर्गत पाच वर्षांमध्ये पाच हजार महिला बचत गटांना बळकट आणि सक्षम केले जाणार आहे. त्यांना व्यावसायिक गोष्टींचे प्रशिक्षण दिले जाईल. उपजीविकेचे स्तोत्र उपलब्ध करून दिले जातील. महिला सक्षमीकरणामध्ये महिला बचत गटांची भूमिका महत्त्वाची आहे. २५० क्लस्टर आणि आठ झोनलस्तरीय फेडरेशन यामुळे त्यांना आर्थिक सक्षमीकरण साध्य करता येणार आहे.

**– शेखर सिंह,** आयुक्त, महापालिका.

### असे प्रकल्प, असे उपक्रम

- » महापालिका समाज विकास विभागाने ‘सक्षमा’ प्रकल्प सुरू केला असून, त्याअंतर्गत पाच वर्षांमध्ये पाच हजार महिला बचत गटांना सक्षम करून विविध व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाईल. त्यासाठी २५० क्लस्टर आणि आठ क्षेत्रीयस्तर फेडरेशन स्थापन केले जाईल
- » कौशल्यम प्रकल्पांतर्गत महापालिका गरजू मुलींना विविध कोर्सचे प्रशिक्षण देत असून, नोकरीच्या संधी उपलब्ध होत आहेत
- » प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय कक्षेत प्रत्येकी दोन याप्रमाणे १६ लाईटहाऊस सेंटर सुरू करण्याचे नियोजन आहे, सध्या सहा लाइटहाउस सेंटर्स असून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध कोर्सचे प्रशिक्षण दिले जात आहे.
- » बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी बचत गट मॉल संकल्पना राबविण्याचे नियोजन असून, त्यामुळे महिलांना त्यांची उत्पादने बाजारात उतरविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होईल. नागरिकांनाही दर्जेदार उत्पादने एकाच ठिकाणी मिळतील
- » नवी दिशा प्रकल्पामध्ये बचतगटांद्वारे शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची देखभाल करण्याचे काम केले जात आहेत
- » सिद्धी प्रकल्पाद्वारे मिळकतकर बिलांचे वाटप महिला बचत गटांद्वारे केले होते, त्यामुळे चार महिन्यात ४४० कोटी रुपयांपेक्षा अधिक कर जमा झाला आहे.


# सर्व्हेक्षण कामाच्या मोबदल्याची शिक्षकांना प्रतिक्षा

## » माहिती पाठवूनही राज्य सरकारकडून मोबदला नाही; पिंपरी-चिंचवडमधील 2 हजार शिक्षकांचा समावेश

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा व खुल्या प्रवर्गाच्या सर्वेक्षणाच्या कामाच्या मोबदल्यापासून पिंपरी-चिंचवड शहरातील दोन हजार १२३ शिक्षक वंचित राहिले आहे. महापालिकेकडून राज्य सरकारला केलेल्या सर्व्हेक्षणाची, शिक्षकांची माहिती पाठवून दिली आहे. मात्र अद्याप वाटप न झाले नाही. मोबदला कधी दिला जाईल या बाबत महापालिका प्रशासन देखील अनभिज्ञ आहे.**

२३ जानेवारी ते २ फेब्रुवारी या दहा दिवसांच्या कालावधीत राज्य मागासवर्ग आयोगाने शिक्षकांकडून मराठा व खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. राज्य सरकारच्या निर्देशानुसार पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने शहरात २ हजार १२३ शिक्षकांची (प्रगणकांची) नियुक्ती केली. नियुक्त केलेल्या शिक्षकांनी सुमारे सहा लाखांहून अधिक घरांचे सर्वेक्षण पूर्ण केले. या माहितीच्या आधारे मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्याचे प्राथमिक काम पुर्ण करण्यात आले आहे. शिक्षकांनी शाळा सांभाळून सर्व्हेक्षणाचीही कामे केली आहेत. त्यांनी तारेवरची कसरत करत शहरात १०० टक्के सर्वेक्षण पूर्ण केल्याचे शिक्षकांनी सांगितले. शहरात ६ लाख ५० हजार मिळकतीची नोंद आहे. तसेच, नोंद नसलेल्या १ लाखांपेक्षा अधिक मिळकत आहेत. दरम्यान, सर्वेक्षण करताना अनेक ठिकाणी घरे बंद असल्याने त्या घरांमधील कुटुंबांची माहिती गोळा करता आली नसल्याचे शिक्षकांनी सांगितले.



३१ तारखेपर्यंत सर्व्हेक्षण पूर्ण न झाल्याने २ फेब्रुवारीपर्यंत मुदत वाढवली होती. त्यानुसार २ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजून ५९ मिनिटांपर्यंत सर्वेक्षणाला ॲप सुरू ठेवले होते. सर्व काम करूनही अद्याप मोबदला दिला नाही.



### असा असेल मोबदला -

» मराठा आरक्षण सर्वेक्षणासाठी शिक्षकांना पहिल्या शंभर घरासाठी दहा हजार रुपये आणि तेथून पुढच्या एका घरासाठी शंभर रुपये तर इतर घरांसाठी दहा रुपये मोबदला देण्याचे राज्य शासनाने जाहीर केले होते. प्रशिक्षणाचे ५०० रुपये मोबदला देण्यात येईल, असा अध्यादेश काढला होता. शहरात २ हजार १२३ कर्मचारी या सर्वेक्षणात सहभागी झाले होते. मात्र मराठा सर्वेक्षण संपून एक महिना उलटला तरी, अद्यापपर्यंत खात्यावर मोबदला जमा झाला नाही.

# पोषण आहारात कोट्यवधींचा घोटाळा

## राज्यातील आदिवासी शाळांमध्ये 80 कोटींचा घोटाळा

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राज्यातील आदिवासी शाळांमध्ये ८० कोटींचा, तर सामाजिक न्याय विभागाकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठीच्या पोषण आहारात २५० कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केला. यासाठी आंबेगाव तालुक्यातील एका खासगी दूध उत्पादक संस्था आणि कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील सहकारी दूध उत्पादक संस्था दूध घोटाळ्यात सहभागी आहे.**



तर क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड, ब्रिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, बीव्हीजी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, ई-कॉमर्स सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड मनुष्यबळ पुरविणाऱ्या कंपन्यांना शालेय पोषण आहारात कंत्राट देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. रोहित पवार यांनी कोणत्याही नेत्याचे नाव घेतले नसले तरी, सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रिफ, प्रसाद लाड या नेत्यांशी या संस्था आणि कंपन्या संबंधित आहेत. रोहित पवार यांची इडीकडून चैकशी सुरू करण्यात आल्यानंतर काही दिवसांपूर्वी त्यांनी सरकारमधील काही मंत्र्यांच्या गैरव्यवहाराची प्रकरणे पुढे आली असून ती जाहीर करण्यात येणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार त्यांनी शुक्रवार पत्रकार परिषद घेतली.राज्यातील ५५२ आश्रम शाळेतील १ लाख ८७ हजार ३९२ विद्यार्थ्यांना प्रत्येकी २५० मिलीलिटर दूध पुरविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी पहिला करार २०१८-१९ आणि दुसरा करार २०२३-२४ मध्ये करण्यात आला. एखाद्या संस्थेला दूध पुरवठा करण्याचे कंत्राट दिले जाते. त्यासाठी निवदा काढल्या जातात आणि ज्याची बोली कमी त्याला काम दिले जाते. २०१८-१९ मध्ये ४६.४९,४९.७५ प्रती लिटर दराने निविदा काढण्यात आल्या होत्या. त्यानंतर दुसऱ्या करारावेळी शासनाने २०० मिलीलिटर टेट्रा पॅक २९.२० रुपये दराने खरेदी केला. त्यामुळे एका लिटरचा भाव १४६ रुपये झाला. राज्यातील शेतकऱ्यांना ३० रुपयांपेक्षा कमी दर दिला जात असताना एका संस्थेला १४६ रुपये प्रति लिटर दर दिला असून त्यामध्ये ८० कोटींचा भ्रष्टाचार झाला असून पराग मिल्क आणि वारणा दूध या कंपन्या कोणाशी संबंधित आहेत, अशी विचारणा रोहित पवार यांनी केली.ते म्हणाले की, समाजकल्याण विभागातही कंत्राट आणि उपकंत्राटे देऊन २५० कोटींचा भ्रष्टाचार करण्यात आला आहे. राज्यातील ४४३ शासकीय वसतिगृहे असून त्यामध्ये ४२ हजार ९८६ तर ९३ शासकीय निवासी शाळांमध्ये १४ हजार ४०० विद्यार्थी आहेत. अशा एकूण ५७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना पोषण आहार पुरविण्याचे कंत्राट दिले जाते.

### 4000 हजार याप्रमाणे कंत्राट

२०१९-२० मध्ये स्थानिक स्तरावर निविदा काढून प्रति विद्यार्थी प्रति महिना ४००० हजार याप्रमाणे कंत्राट दिले जात होते. २०२२ मध्ये प्रति विद्यार्थी ५ हजार २०० रुपये दराने निविदा काढण्यात आले. त्यामध्ये थेट २५ टक्के वाढ करण्यात आली.ज्या कंपन्यांना कंत्राट मिळाले आहे त्या कंपन्या सरकारमधील लोकांशी संबंधित आहेत. प्रति वर्षी ३५० कोटी याप्रमाणे तीन वर्षांत १ हजार ५० कोटींचे कंत्राट देण्यात आले असून त्यामध्ये २५० कोटींचा घोटाळा करण्यात आला आहे. क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड, ब्रिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, बीव्हीजी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, ई-कॅमर्स सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्यांना शालेय पोषण आहाराचे कंत्राट देण्यात आल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला.राज्यातील आदिवासी शाळांमध्ये ८० कोटींचा, तर सामाजिक न्याय विभागाकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठीच्या पोषण आहारात २५० कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केला.

---

# गुढी पाडव्याचे औचित्याने "बालेवाडी शॉपिंग फेस्टिवल"चे आयोजन

## एकाच छताखाली सर्वांना आवडणाऱ्या आणि परवडणाऱ्या वस्तू खरेदी करता येणार

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**साडेतीन मुहूर्त पैकी एक आणि नववर्षाचा पहिला दिवस म्हणजे गुढी पाडवा. शालिवाहन संवत्सराचा हा पहिला दिवस आहे. वेदांग ज्योतिष या ग्रंथात सांगितलेल्या साडेतीन मुहूर्तांपैकी हा एक मुहूर्त आहे. या दिवशी नवीन वस्तू खरेदी, व्यवसाय प्रारंभ, नव उपक्रमांचा प्रारंभ, सुवर्ण खरेदी इत्यादी गोष्टी केल्या जातात.**




दारी उभारलेली गुढी हे विजय आणि समृद्धीचे प्रतीक आहे असे मानले जाते. या वर्षी बुधवार ९ एप्रिल २०२४ रोजी, गुढीपाडवा असून या दिवसापासून हिंदू नववर्षाची सुरुवात होणार आहे. नवीन वर्ष नवा उत्साह आणि चैतन्य घेऊन येत असते. गुडीपाडव्याच्या औचित्याने बालवडीत ६ आणि ७ एप्रिल दरम्यान "बालेवाडी शॉपिंग फेस्टिवल"चे आयोजन करण्यात आले आहे.बालवडीत २० आणि २१ मे दरम्यान "बालवाडी शॉपिंग फेस्टिवल"चे आयोजन करण्यात आले आहे. या ठिकाणी एकाच छताखाली सर्वांना आवडणाऱ्या आणि परवडणाऱ्या वस्तू खरेदी करता येणार आहेत. हा फेस्टिव्हल बालवाडी येथील, दसरा चौकातील, आठवडे बाजार ग्राउंडवर दुपारी ३.०० ते रात्री ९.३० पर्यंत सर्वांसाठी खुला असणार आहे. बाणेर-बालेवाडीकरांना मनसोक्त खरेदी आणि लज्जतदार पदार्थांची मेजवानी एकाच छताखाली दोन दिवस मिळणार आहे. या "बालेवाडी शॉपिंग फेस्टिवल" मध्ये प्रामुख्याने पैठणी, शोभेच्या वस्तू, ज्वेलरी, पंजाबी सूट्स, प्लाझो, फाब्रिक डिझाईनर साड्या, रेडी टू वेअर ब्लाऊज, लॉन्ग आणि शॉर्ट कुर्तीज, कॉटन मेन्स शर्ट्स आणि किड्स वेअर, लहान लहान मुलांसाठी लाकडी खेळणी बेडशीट, सुगंधी हॅन्डमेड सोप, ब्युटी प्रॉडक्ट्स, ऑरगॅनिक प्रॉडक्ट, शोभेच्या वस्तू, महिला बचत गटांनी तयार केलेल्या दर्जेदार वस्तू, लोणच्यांचे विविध प्रकार, दर्जेदार गावरान आणि घरगुती मसाले, पापड कुर्डाई, शोभेच्या वस्तू, रेडी टू कुक फूड्स, मातीची भांडी, होम डेकोरच्या वस्तू, असे स्टॉल असणार आहेत. या परिसरातील लोक मोठ्या संख्येने या शॉपिंग अँड फूड फेस्टिवलला भेट देत असतात.

### ग्रीन अँपल एक्सहिबिशन हक्काचे व्यासपीठ

या शॉपिंग अँड फूड फेस्टिवलच्या माध्यमातून वेगवेगळ्या क्षेत्रातील स्वतःचा व्यवसाय सुरु करणाऱ्या महिला आणि व्यावसायिकांना एकत्र करत ग्रीन अँपल एक्सहिबिशन हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. तसेच व्यवसायावर असणाऱ्या कुटुंबांना आपल्या स्थानिक पातळीवरील उद्योगाला प्रोत्साहन देऊन त्यांना हातभार लावण्याचेही काम ग्रीन अँपल एक्सहिबिशन करत आहे.

# महायुतीत मावळच्या उमेदवारीवरून ट्विस्ट; शंकर जगतापांच्या नावाची चर्चा!

## खासदार श्रीरंग बारणे, माजी मंत्री बाळा भेगडे यांचे टेन्शन वाढले

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभेसाठी उमेदवार म्हणून भाजपाचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नावाची जोरदार चर्चा रंगू लागली आहे. त्यामुळे या मतदारसंघात आता उमेदवारीवरून ट्विस्ट निर्माण झाला आहे. शंकर जगताप हे तगडे उमेदवार ठरतील असा विश्वास त्यांचे समर्थक व्यक्त करत आहेत. अंतिम निर्णय भाजपाचे पक्षश्रेष्ठी घेणार असले तरी या चर्चा मात्र खासदार श्रीरंग बारणे आणि माजी मंत्री बाळा भेगडे या इच्छुकांचे टेन्शन वाढवणारे ठरणार आहे.**




देशभरातील लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजले आहे. महाराष्ट्रात मात्र निवडणुकीला अवधी आहे. त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडीतील जागा वाटपाचा तिढा अद्याप सुटला नसून चर्चेवर चर्चा सुरु हेत. दररोज वेगवेगळ्या राजकीय घडामोडींना मात्र ऊत आला आहे. या घडामोडी नागरिकांसाठी मात्र मनोरंजक ठरताना दिसत आहे. असाच राजकीय ट्विस्ट मावळ लोकसभा मतदारसंघात वाढला आहे. या मतदारसंघात खासदार श्रीरंग बारणे हे भाजपाच्या तिकिटावर लढतील अशा चर्चा सुरु आहेत.तर दुसरीकडे भाजपाला मतदारसंघ सुटल्यास आयात उमेदवार न देता माजी मंत्री बाळा भेगडे यांना द्या अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली आहे. या दोन नावांमध्ये आता भाजपाच्या पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नावाची भर पडली आहे. त्यांना उमेदवारी द्या, अशी मागणी त्यांचे समर्थक करत आहेत.

मावळ लोकसभेत समावेश असणाऱ्या चिंचवड विधानसभा मतदारसंघ मतदाराच्या दृष्टीने मोठा आहे. या मतदारसंघात 2019 मध्ये, चिंचवड विधानसभा मतदारसंघात एकूण 5 लाख 18 हजार 480 मतदार होते. एकूण वैध मतांची संख्या २ लाख ७८ हजार २३१ होती.

या जागेवरून भारतीय जनता पक्षाचे उमेदवार दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप विजयी होऊन आमदार झाले. त्यांना एकूण 1 लाख 50 हजार 723 मते मिळाली. जगताप यांच्या निधनानंतर लागलेल्या पोटनिवडणुकीत 2023 च्या विधानसभा निवडणुकीत भाजपा पक्षाचे अश्विनी लक्ष्मण जगताप या 1 लाख 35 हजार 603 मते मिळवून विजयी झाल्या. अश्विनी जगताप यांच्या विजयात मोलाचा वाटा शंकर जगताप यांनी उचलला आहे. तेव्हापासून त्यांचे नाव चर्चेत आले आहे.

त्यांना उमेदवारी दिल्यास चिंचवड मधील मोठे मतदार त्यांच्या पाठीमागे उभे राहतील. तसेच आयात उमेदवार न दिल्याने इतरही नाराजांचे बंड थंड होण्याची चर्चा आहे. तसेच उर्वरित मतदारसंघातील भाजपाच्या आमदारांचा त्यांना पाठिंबा मिळेल असे राजकीय आखले जात आहे. त्यामुळे शंकर जगताप यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडणार की खासदार बारणे, माजी मंत्री बाळा भेगडे बाजी मारणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

### दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांची ती अपूर्ण ईच्छा होणार पूर्ण ?



**» दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांची राजकीय ताकद मोठी होती. त्याच्या जोरावर मावळ लोकसभेवर त्यांनी वारंवार आपला दावा केला होता. शेकापच्या तिकिटावर त्यांनी निवडणूक देखील लढवली होती. मात्र त्यांना लोकसभा निवडणुकीत अपयश आले. त्यांच्या पश्च्यात त्यांचे बंधू शंकर जगताप यांचे नाव उमेदवारीसाठी चर्चेत आल्याने ते दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांची खासदारकीची अपूर्ण ईच्छा पूर्ण करतील का ते या निमित्ताने पाहायला मिळणार आहे.**

---

# 'भाजपकडून शहरात आचारसंहितेचा भंग, कारवाई करा'

## तुषार कामठे : महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे मागणी

।पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहरात शेकडो सार्वजनिक ठिकाणी भिंतींवर भाजपचे चिन्ह कायमस्वरूपी रंगविण्यात आले असून ते तात्काळ मिटविण्यात यावे, तसेच संबंधित दोषींवर कारवाई करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्यावतीने शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी आयुक्त शेखर सिंह यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, "देशभरात लोकसभा निवडणुका जाहीर झाल्या असून आदर्श आचारसंहिता घोषित करण्यात आली आहे, त्या पार्श्वभूमीवर शहरात महानगरपालिका प्रशासनाकडून राजकीय पक्ष चिन्ह नावे इत्यादी झाकण्याचे तसेच राजकीय जाहिरात होर्डिंग फ्लेक्स काढण्याचे काम करण्यात येत आहे.

> आम्ही आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, गेल्या काही दिवसांपासून भारतीय जनता पक्षाकडून शहरभरात शेकडो सार्वजनिक ठिकाणी भिंतींवर पक्षाचे चिन्ह कायमस्वरूपी रंगविण्यात आल्याचे पाहायला मिळते. त्याकडे महापालिका प्रशासन दुर्लक्ष करत असून त्यामुळे आदर्श आचारसंहितेचे थेटपणे उल्लंघन होत आहे. तरी आमची आपणांस नम्र विनंती आहे की, शहरात ज्या ज्या ठिकाणी असे पक्ष चिन्ह व नाव रंगविण्यात आले आहे ते महापालिका प्रशासन तथा निवडणूक विभागाकडून तात्काळ मिटविण्यात यावे, शिवाय आचारसंहिता भंगाच्या घटना घडणार नाहीत याकडे कुठल्याही राजकीय पक्षाचा अभिनिवेश किंवा दबाव न बाळगता कारवाई करावी.
>
> **-तुषार कामठे,** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष

# आपण सिंचन क्षेत्रात 50 वर्षे मागे का?




**भारतात वार्षिक ११९९ अब्ज घनमीटर पावसाचे पाणी, नद्यांचे २.५ लक्ष किलोमीटर लांब विखुरलेले जाळे, जगातील तिसरी मोठी धरणसंख्या (५७४५), २.२ कोटी विहिरी व २० लक्षपेक्षाही जास्त लहान तलाव आणि तळी यातून अभिसरण होते. एवढी विपुल जलसंपदा असतानाही देश कायम पाणी टंचाईग्रस्त का असा सवाल सर्वसामान्यांच्या मनात येणे स्वाभाविक आहे.**

वॉशिंग्टनस्थित वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूटनुसार ज्या देशांत उपलब्ध पाण्याच्या ४० ते ८० टक्के पाणीवापर होतो ते 'तीव्र पाणीटंचाई'च्या, तर ८० टक्क्यांवर पाणीवापर होतो ते 'अत्यंत तीव्र पाणीटंचाई' श्रेणीत येतात. सदर संस्थेनुसार भारत पाणीटंचाईच्या शेवटच्या श्रेणीत पोहोचला आहे. देशात पाणीटंचाईसाठी मुख्य कारणे म्हणजे – जलविषयक अपुरी, अविश्वसनीय आणि दुर्गम सांख्यिकीय माहिती, पाण्यासंबंधित शासकीय विभागात समन्वयाचा अभाव, अपुऱ्या पायाभूत सुविधा, शासनस्तरावर पाणी व्यवस्थापन विषयास कमी प्राधान्य, कालबाह्य /अपुरे कायदे तसेच त्यांच्या अंमलबजवणीचा अभाव, पाणीवापराचे मोजमाप न होणे, पाण्याचे अत्यंत कमी दर, भात, ऊसासारख्या जास्त पाणी लागणाऱ्या पिकांचे वाढते क्षेत्र, पाण्याशी निगडीत धोरणात्मक बाबीं ठरवण्यामध्ये स्थानिक लोकांचा सहभागाचा अभाव, पाणी वापरकर्त्या गटांमधील



अंतर्गत अधिकारक्षेत्राचा संघर्ष, अपुरी जन जलजागृती/ जल साक्षरता, जनतेकडून सुधारणांना विरोध, कुशल मनुष्यबळ आणि संस्थात्मक क्षमतेचा अभाव ही आहेत. यातून लक्षात येते की भारतात पाणीटंचाईचे संकट हे नैसर्गिक उपलब्धेच्या कमतरतेमुळे नसून ते ढिसाळ जलव्यवस्थापन व विषेशत: जल कारभारच्या (गव्हर्नन्स) अभावामुळे निर्माण झाले आहे. भारताप्रमाणे चीनही पाणीसंकटाचा सामना करत आहे. पाण्याचे सुयोग्य नियोजन, नावीन्यपूर्ण व्यवस्थापन व प्रभावी जलकारभाराच्या माध्यमातून पाणी टंचाईवर कशी मत करावी हे चीनकडून शिकण्यासारखे आहे. भारतात नूतनीकरणक्षम (रीन्युवेबल) पाण्याची उपलब्धता १९९९ अ. घ. मी. तर चीनमध्ये २८४० अ. घ. मी. आहे. भारतात पाण्याचा वार्षिक एकूण वापर ७६१ अ. घ. मी. तर चीनचा आपल्यापेक्षा कमी (५८१ अ. घ. मी.) आहे. दोन्ही देशात सिंचनाचे क्षेत्र जवळपास सारखेच असूनही कृषी क्षेत्रासाठी चीनमध्ये एकूण पाणी वापराच्या ६३ टक्के (३६६ अ. घ. मी.) तर भारतात त्याच्या जवळपास दुप्पट (६८८ अ. घ. मी.) पाणी वापरले (९० टक्के) जाते. याचा अर्थ भारतात सिंचनाच्या पाण्याचा वापर अत्यंत अकार्यक्षम पद्धतीने केला जातो.भारतात, भूपृष्टीय पाण्याने कालव्याद्वारे होणाऱ्या सिंचन क्षेत्राचा टक्का सातत्याने कमी होत आहे. सन १९६० मध्ये कालव्याद्वारे ८.३ दशलक्ष हेक्टर तर भुजलावर ६ दशलक्ष हेक्टर सिंचित क्षेत्र होते. कालवा सिंचन क्षेत्र १९९० पर्यन्त वाढत जाऊन ते १७ दशलक्ष हेक्टर झाले व त्यानंतर त्यात फारशी वाढ होत नाही. आज देशातील एकूण ७७.७ दशलक्ष हेक्टर सिंचन क्षेत्रापैकी भूजलाद्वारे ६० टक्के क्षेत्र तर भूपृष्टीय पाणी / कालवा सिंचनाद्वारे ४० टक्के भिजते. भारतात दरवर्षी २४० अ.घ.मी. भूजल (उपलब्धीच्या ६० टक्के ) उपसले जाते जे अमेरिका आणि चीन यांच्या एकत्रित उपशापेक्षा अधिक आहे. एकूण उपशाच्या ८७ टक्के भूजल सिंचनासाठी वापरले जाते. चीनमध्ये भारताच्या जवळपास दुप्पट भूजल उपलब्ध असूनही केवळ १८.५ टक्के भूजल उपसले जाते. हवामान बदलास तोंड देण्यासाठी भूजल सुरक्षितता महत्वाची आहे. उत्तरचीनमध्ये भूजल उपशाचे नियमन करणेसाठी शेतकऱ्यांना प्रिपेड कार्डचा वापर बंधनकारक केला आहे. पाणी टंचाईवर मात करण्यासाठी चीन सरकारने सिंचनाच्या पाणी मागणीवर मर्यादा (४०० अ. घ. मीटरच्या आत) आणण्याचे धोरण स्वीकारले आहे. सिंचनाचे पाणी वाचवून ते ओद्योगिक, घरगुती तसेच पर्यावरणासाठी वळवले जात आहे. याचा उद्देश सिंचन क्षेत्र कमी करणे नसून कमी पाण्यात जास्त क्षेत्राचे सिंचन करणे हा आहे. त्यासाठी चीन शासनाने सिंचन प्रणालीचे आधुनिकीकरण, शेतावर पाणी वाचवण्याचे आधुनिक तंत्रज्ञान व सिंचन व्यवस्थापन विषयक संस्थाचे आधुनिकीकरण यात मोठी आर्थिक गुंतवणूक केली आहे. त्याचबरोबर कडक कायदे, पाणीपट्टीत वाढ, कुशल अभियंते व सिंचन व्यवस्थापक तयार करण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखला आहे.

## संपादकीय »

### नस्ती उठाठेव

***स्त्रीने आपले नाव काय ठेवायचे, ते बदलायचे की नाही, या जुन्या झालेल्या मुद्द्यांमध्ये सरकारी यंत्रणांनी कशाला नाक खुपसावे ?***

एखाद्या विवाहित स्त्रीला काहीही विचारले, तरी 'आमच्या ह्यांना विचारून सांगते', असे उत्तर येत असे. साध्या भाजीखरेदीपासून ते अगदी घर किंवा सोन्याच्या खरेदीपर्यंत कशालाही हेच उत्तर दिले जायचे. अगदी स्वयंपाकाची भांडी खरेदी करायला गेल्यावरही ज्या भांड्याला नवऱ्याचा स्वयंपाकघरात कधी हातही लागणार नसे, त्या भांड्यावरही स्त्रिया आवर्जून नवऱ्याचेच नाव घालत. एवढेच नाही, तर मालक, धनी, साहेब अशा वर्चस्ववाचक शब्दांनीच नवऱ्याचा उल्लेख केला जात असे. हा काळ मागे सरला, आता स्त्री पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून उभी आहे, तिचे आणि तिच्या नवऱ्याचे सहजीवन बरोबरीच्या पायावर उभे आहे, असे तुम्हाला वाटत असेल तर ते साफ चूक आहे. महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे यांनी आपल्या अथक परिश्रमातून चिखलात रुतलेला स्त्रीजीवनाचा जो गाडा बाहेर काढला.

शिक्षण हे चारित्र्याचा विकास आणि राष्ट्रबांधणीचे उदात्त कार्य आहे. आपले राष्ट्रीय शिक्षण धोरण हाच सर्वागीण उद्देश ठेवून तयार करण्यात आले आहे. त्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना सर्व अध्ययन साहित्य त्यांच्या मातृभाषांमध्ये उपलब्ध व्हावे यासाठी १७ राज्यांतील ५२ स्थानिक भाषांत प्राथमिक पाठ्यपुस्तके तयार करण्यात आली आहेत..

# आपल्या बोलीतून शिंकता यावे म्हणून..

प्राचीन काळापासून भारत आपल्या सांस्कृतिक वैविध्यासाठी प्रसिद्ध आहे. भारताच्या सर्व प्रदेशांमध्ये अनेक भाषांचा विकास बोली आणि लेखी अशा दोन्ही स्वरूपांत झाला. राष्ट्राच्या समृद्ध भाषक पटाचे हे प्रतीक आहे. हे बहुभाषिक चैतन्य भारताच्या ठळक वैशिष्ट्यांपैकी एक आहे. आंतरसंवादासाठी अत्यावश्यक असलेल्या भाषा व बोलींचे भंडार त्यामुळे जोपासले जाते. पायाभूत भाषिक वैविध्य असले तरी ते एकात्मीकरणाला बळ देते, राष्ट्राला एकत्र बांधून ठेवते. शिवाय, देशभरात ज्ञानाचा प्रसार करण्यामध्ये हे बहुभाषिक अंग खूपच उपयुक्त ठरत आहे. भारताच्या सामाजिक-सांस्कृतिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगतीमध्ये देशाच्या बहुभाषिकतेने निभावलेली भूमिका, अलीकडेच अमलात आणल्या गेलेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरण- २०२०मध्ये, अधोरेखित करण्यात आली आहे. राष्ट्राच्या विकासासाठी भाषिक वैविध्याचा उपयोग करण्यावर भर देणाऱ्या या धोरणात सर्व शैक्षणिक



स्तरांवर बहुभाषिकतेचा प्रसार करण्याचा मुद्दा मांडण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या स्थानिक भाषेत शिकण्याच्या पुरेशा संधी दिल्या जातील आणि शैक्षणिक साहित्य सर्व भारतीय भाषांमध्ये उपलब्ध असेल हे यात अध्याहृत आहे. असे उपक्रम केवळ बहुभाषिकतेच्या वैशिष्ट्याला अधिक समृद्ध करत नाहीत, तर 'विकसित भारता'चे उद्दिष्ट साध्य करण्यामध्येही मोठे योगदान देतात.विद्यार्थ्यांना सर्व अध्ययन साहित्य त्यांच्या मातृभाषांमध्ये उपलब्ध होईल, आपल्या स्थानिक भाषांमध्ये शैक्षणिक प्रवास सुरू करण्याची संधी त्यांच्या आवाक्यात येईल या उद्देशाने केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने एक लक्षणीय उपक्रम हाती घेतला आहे. हे सुलभ करण्यासाठी ५२ प्राथमिक स्तरावरील पुस्तके स्थानिक भाषांमध्ये तयार करण्यात आली आहेत, जेणेकरून, लहान मुले त्यांच्या पायाभूत भाषिक कौशल्यांच्या आधारे सहजगत्या औपचारिक शिक्षण घेऊ शकतील. ही प्राथमिक पुस्तके अर्थात 'प्रायमर्स' पाठ्यपुस्तकांच्या व वाचन साहित्याच्या स्वरूपात प्रस्तुत करण्यात आली आहेत. त्यांचे उद्दिष्ट भाषिक कौशल्यांची जोपासना हे तर आहेच, शिवाय, विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि चिकित्सक विचाराला चालना देणे, हे उद्दिष्टही या प्रायासामागे आहे.

शिक्षण मंत्रालयाच्या प्रोत्साहनाने राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एनसीईआरटी) १७ राज्यांतील ५२ स्थानिक भाषांतील प्रायमर्सच्या निर्मितीप्रक्रियेचे नेतृत्व केले आहे. दखलपात्र बाब म्हणजे भाषांची निवड प्रादेशिक बोलीभाषांपुरती मर्यादित नाही, त्यामध्ये आदिवासी समुदायांमध्ये बोलल्या जाणाऱ्या बोलींचाही समावेश आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# बोट धरून राजकारणात आले असते तर...

## पंतप्रधान मोदींच्या विधानावर शरद पवारांची फिरकी

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सात वर्षांपूर्वी पुण्यात एका जाहीर सभेत बोलत असताना मंचावर बसलेल्या शरद पवारांचे कौतुक केले होते. शरद पवारांचे बोट धरून मी राजकारण शिकलो, असे विधान त्यांनी केले होते. मोदींचे हे विधान त्यावेळी चांगलेच गाजले. तसेच अधूनमधून या विधानाची आठवणही विरोधक करून देत असतात. मात्र आता खुद्द शरद पवारांनीच या विधानाची आठवण करून दिली आहे. बारामती येथे शेतकरी-कामगार मेळाव्यात बोलत असताना शरद पवार यांनी या विधानावर भाष्य केलं.**



शरद पवार आपल्या भाषणात म्हणाले की, पंतप्रधान मोदी साहेब बोलतात खूप. एकदा तर त्यांनी सांगितलं की, शरद पवारांचे बोट धरून मी राजकारणात आलो. पण आज त्यांचे जे काही राजकारण सुरू आहे. ते माझ्या विचारांनी नाही. माझं बोट धरल्यावर मी असलं काम करू देणार नाही. मोदी सरकारने आखलेली धोरणे हिताची नाहीत. व्यापाऱ्यांची मी नियोजित केलेली बैठक याआधी महाराष्ट्रात कधीही रद्द झाली नव्हती. मात्र यावेळी ती रद्द झाली, कारण एकप्रकारचा दबाव टाकला जात आहे. दबावानं समाजकारण, राजकारण करता येत नाही."पंतप्रधान नरेंद्र मोदी हे कर लावून जनतेकडून १०० रुपये वसूल करतात आणि मग त्यातलेच सहा रुपये आपल्या खिशात टाकून म्हणतात मी तुम्हाला पैसे दिले. ही आहे मोदी गॅरंटी. जिथे सामान्य लोकांचे हित नाही, तिथे बदल पाहिजे. बदल पाहिजे असेल तर लोकसभेची निवडणूक महत्त्वाची आहे. म्हणून निवडणूकीत बटण दाबलं पाहिजे. आता यावेळेची खूण ही वेगळी आहे. घड्याळ्याची खूण ही तुम्हाला पाठ होती. आमचा पक्ष, घड्याळ, झेंडा सगळ्याचीच चोरी झाली. बाकी किरकोळ काही नाही, होलसेल चोरी झाली. सगळ्या सगळे सोडून गेले. आता आम्ही नवा पक्ष, नवी खूण, नवा झेंडा, पण तोच जुना कार्यक्रम घेऊन पुढे आलेलो आहोत", असेही शरद पवार म्हणाले.शरद पवार पुढे म्हणाले, पंतप्रधान मोदी संसदेत जेव्हा भेटतात, तेव्हा अतिशय प्रेमानं बोलतात. हे बोलणं ठीक आहे, पण करतात काय? त्यांचं धोरणं काय? सत्ता ही लोकांच्या भल्यासाठी वापरायची असते. पण आज सत्ता फक्त विरोधकांना नामोहरण करण्यासाठी वापरली जात आहे. केजरीवाल नावाचा सामान्य कुटुंबातला तरूण मुख्यमंत्री झाला. त्यांची शैक्षणिक संस्था, आरोग्य केंद्र ही कशी चालवतात हे बघायला देशातून आणि बाहेरून लोक यायला लागले. मात्र त्यांना आज तुरुंगात टाकण्यात आलं आहे."काही लोकांनी वेगळी भूमिका घेतली. लोकशाहीमध्ये कुणालाही भूमिका घ्यायचा अधिकार आहे. पण एक अट आहे. मी तुम्हाला मत मागितलं, तुम्ही मला मत दिलं, तुम्ही मला निवडून दिलं आणि निवडून दिल्यानंतर ज्या नावाने, ज्या पक्षाच्या चिन्हावर मत मागितले, तेच नाव, पक्ष, सगळं तुम्ही विसरला. मग तुम्ही लोकांची फसवणूक करत नाही का? राजकारणामध्ये लोकांना दिलेला शब्द हा पाळला पाहिजे, अशा शब्दात शरद पवार यांनी अजित पवार गटावर पक्ष चोरल्याची टीका केली. तसेच अधूनमधून या विधानाची आठवणही विरोधक करून देत असतात. मात्र आता खुद्द शरद पवारांनीच या विधानाची आठवण करून दिली आहे.शेतकरी-कामगार मेळाव्यात बोलत असताना शरद पवार यांनी या विधानावर भाष्य केलं.

### यावेळेची खूण ही वेगळी आहे

» "पंतप्रधान नरेंद्र मोदी हे कर लावून जनतेकडून १०० रुपये वसूल करतात आणि मग त्यातलेच सहा रुपये आपल्या खिशात टाकून म्हणतात मी तुम्हाला पैसे दिले. ही आहे मोदी गॅरंटी. जिथे सामान्य लोकांचे हित नाही, तिथे बदल पाहिजे. बदल पाहिजे असेल तर लोकसभेची निवडणूक महत्त्वाची आहे. म्हणून निवडणूकीत बटण दाबलं पाहिजे. आता यावेळेची खूण ही वेगळी आहे. घड्याळ्याची खूण ही तुम्हाला पाठ होती. आमचा पक्ष, घड्याळ, झेंडा सगळ्याचीच चोरी झाली. बाकी किरकोळ काही नाही, होलसेल चोरी झाली. सगळ्या सगळे सोडून गेले. आता आम्ही नवा पक्ष, नवी खूण, नवा झेंडा, पण तोच जुना कार्यक्रम घेऊन पुढे आलेलो आहोत", असेही शरद पवार म्हणाले.शरद पवार पुढे म्हणाले, पंतप्रधान मोदी संसदेत जेव्हा भेटतात, तेव्हा अतिशय प्रेमानं बोलतात. हे बोलणं ठीक आहे, पण करतात काय? त्यांचं धोरणं काय? सत्ता ही लोकांच्या भल्यासाठी वापरायची असते. पण आज सत्ता फक्त विरोधकांना नामोहरण करण्यासाठी वापरली जात आहे. केजरीवाल नावाचा सामान्य कुटुंबातला तरूण मुख्यमंत्री झाला. त्यांची शैक्षणिक संस्था, आरोग्य केंद्र ही कशी चालवतात हे बघायला देशातून आणि बाहेरून लोक यायला लागले.

# सागर बंगल्यावर धाराशिवच्या उमेदवारीसाठी रांग

## देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर तोडगा काढण्याचे आव्हान

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मागील दोन्ही लोकसभा निवडणुकीत युतीच्या उमेदवाराला मिळालेल्या मताधिक्यामुळे अनेकांचा आत्मविश्वास वाढला आहे. मोदींच्या लाटेत देशाच्या संसदेत जाण्याचा मार्ग सहज शक्य असल्याची धारणा बळावली आहे.**

त्यामुळे धाराशिव लोकसभा मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या भाजपा आणि महायुतीतील उमेदवारांची संख्या मोठी आहे. देवेंद्र फडणवीस यांनीच यावर तोडगा काढावा, यासाठी शुक्रवारी दिवसभर सागर बंगल्यावर इच्छुक उमेदवारांची रांग लागली होती. एकमेकांना टाळून फडणवीसांच्या भेटीला गेलेले इच्छुक उमेदवार तिथे मात्र एकमेकांच्या समोर उघड झाले. या सर्व इच्छुकांची समजूत काढून देवेंद्र फडणवीस नेमका कोणता हुकमी तोडगा काढणार? हे दोन दिवसांत स्पष्ट होईल.धाराशिव लोकसभा मतदारसंघात युतीच्या



माध्यमातून शिवसेना यापूर्वी लढत आली आहे. शिवसेनेची शकले झाली आणि भाजपाला धाराशिव जिल्ह्यात जास्तीचा लोकानुनय मिळाला. २०१४ आणि २०१९ या दोन्ही निवडणुकांमध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला प्रतिसाद देत मतदारसंघातील मतदारांनी दोन्हीवेळा शिवसेनेला मोठे मताधिक्य दिले. यापूर्वी विजयी झालेल्या शिवसेनेच्या कल्पना नरहिरे, शिवाजी कांबळे यांना असे मताधिक्य मिळालेले नव्हते. २०१४ साली दोन लाख ३४ हजार मतांनी तर २०१९ साली एक लाख २६ हजार मतांनी शिवसेनेचा उमेदवार लोकसभेत दाखल झाला. आता पुन्हा मोदी यांच्या नेतृत्वाला जिल्ह्यातून तसाच प्रतिसाद मिळेल, या भावनेतून महायुतीकडून उमेदवारी मिळावी, यासाठी डझनभराहून अधिक इच्छुकांनी पक्षश्रेष्ठींचे उंबरठे मागील महिनाभरापासून झिजविण्यास सुरुवात केली आहे. शुक्रवारी दिवसभर देवेंद्र फडणवीस यांच्या सागर या सरकारी बंगल्यावर धाराशिवच्या उमेदवारीसाठी इच्छुकांची रांग लागली होती.

### बिराजदार हे एकमेव नाव चर्चेत

» आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचे पुतणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत इच्छुक आहेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून सुरेश बिराजदार हे एकमेव नाव चर्चेत आहे. तर भाजपाकडून माजी सनदी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी,संताजी चालुक्य, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रामदास कोळगे, भाजपाचे सुधीर पाटील, ॲड. व्यंकट गुंड, बसवराज मंगरूळे, अशी मोठी यादी आहे.

# मोदींचीही झाली होती ईडी चौकशी

## मोदींना नऊ तास कार्यालियात बसवून ठेवण्यात आलं

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडीने अटक केल्यानंतर देशभरातील विरोधी पक्षांनी सत्ताधारी भाजपावर टीकास्र सोडले. विद्यमान मुख्यमंत्र्याला अशाप्रकारे ईडीने ताब्यात घेतल्यामुळे हा लोकशाहीवरचा हल्ला असल्याची टीका विरोधकांनी केली आहे. या टीकेला उत्तर देत असताना भाजपाचे नेते, उत्तर मुंबईचे खासदार गोपाळ शेट्टी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही ईडीकडून चौकशी झाली असल्याचा किस्सा सांगितला. मोदींना अटकेची भीती नव्हती, त्यामुळे ते ईडीच्या चौकशीला सामोरे गेले. विरोधकांना जर काहीच केले नसेल तर त्यांनी चौकशीला सामोरे जाण्यास काय हरकत आहे, असाही सवाल गोपाळ शेट्टी यांनी उपस्थित केला.**



गोपाळ शेट्टी म्हणाले, "पंतप्रधान मोदी जेव्हा गुजरातचे मुख्यमंत्री होते, तेव्हा त्यांना नऊ तास ईडी कार्यालयात बसवून ठेवण्यात आलं होतं. त्यांनी नऊ तास ईडीच्या प्रश्नांना उत्तरे दिली. माध्यमे ही बातमी दाखवत नाहीत, पण हे सत्य आहे. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडीने नऊ वेळा चौकशीसाठी बोलावलं, पण ते गेले नाहीत. आपण चौकशीला गेलो तर अटक होईल, ही भीती केजरीवाल यांना होती, त्यामुळेच बहुतेक ते चौकशीसाठी जाण्यास टाळाटाळ करत असावेत."ज्याला कर नाही त्याला डर कशाला? विरोधक काहीही बोलत असले तरी त्याला काही महत्त्व नाही. कारण कायद्यापेक्षा कुणी मोठा नाही. हे देशाच्या संविधानाने दाखवून दिले आहे. भविष्यात संविधानाचा धाक तर उरला पाहीजे ना. कुणी म्हणेल मी आमदार आहे, मी खासदार आहे, मी मंत्री आहे, मी मुख्यमंत्री आहे, मी वाट्टेल ते करेन, मला कोणी विचारणार नाही. तर मग कायदा फक्त गरिबांसाठी आहे का? असा प्रश्न निर्माण होऊ शकतो", असेही गोपाळ शेट्टी म्हणाले. भाजपा नेते गोपाळ शेट्टी हे उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातून भाजपाच्या तिकीटावर २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने निवडून आले होते. त्याआधी याच मतदारसंघातील विधानसभेतून त्यांनी आमदारकीही भूषविली होती. उत्तर मुंबई हा भाजपासाठी सर्वात सुरक्षित असा मतदारसंघ मानला जातो. मात्र यंदा गोपाळ शेट्टी यांना बाजूला सारून केंद्रीय मंत्री गोपाळ शेट्टी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. केंद्रीय नेतृत्वाचा हा निर्णय मान्य करून गोपाळ शेट्टी यांनी पियुष गोयल यांच्या प्रचाराची धुरा आपल्या खांद्यावर घेतली आहे.दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडीने अटक केल्यानंतर देशभरातील विरोधी पक्षांनी सत्ताधारी भाजपावर टीकास्र सोडले. विद्यमान मुख्यमंत्र्याला अशाप्रकारे ईडीने ताब्यात घेतल्यामुळे हा लोकशाहीवरचा हल्ला असल्याची टीका विरोधकांनी केली आहे. या टीकेला उत्तर देत असताना भाजपाचे नेते, उत्तर मुंबईचे खासदार गोपाळ शेट्टी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही ईडीकडून चौकशी झाली असल्याचा किस्सा सांगितला. मोदींना अटकेची भीती नव्हती, त्यामुळे ते ईडीच्या चौकशीला सामोरे गेले. विरोधकांना जर काहीच केले नसेल तर त्यांनी चौकशीला सामोरे जाण्यास काय हरकत आहे, असाही सवाल गोपाळ शेट्टी यांनी उपस्थित केला. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडीने नऊ वेळा चौकशीसाठी बोलावलं, पण ते गेले नाहीत. आपण चौकशीला गेलो तर अटक होईल, ही भीती केजरीवाल यांना होती.

### कायदा फक्त गरिबांसाठी आहे का?

, त्यामुळेच बहुतेक ते चौकशीसाठी जाण्यास टाळाटाळ करत असावेत."ज्याला कर नाही त्याला डर कशाला? विरोधक काहीही बोलत असले तरी त्याला काही महत्त्व नाही. कारण कायद्यापेक्षा कुणी मोठा नाही. हे देशाच्या संविधानाने दाखवून दिले आहे. भविष्यात संविधानाचा धाक तर उरला पाहीजे ना. कुणी म्हणेल मी आमदार आहे, मी खासदार आहे, मी मंत्री आहे, मी मुख्यमंत्री आहे, मी वाट्टेल ते करेन, मला कोणी विचारणार नाही. तर मग कायदा फक्त गरिबांसाठी आहे का? असा प्रश्न निर्माण होऊ शकतो", असेही गोपाळ शेट्टी म्हणाले.भाजपा नेते गोपाळ शेट्टी हे उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातून भाजपाच्या तिकीटावर २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने निवडून आले होते. त्याआधी याच मतदारसंघातील विधानसभेतून त्यांनी आमदारकीही भूषविली होती. उत्तर मुंबई हा भाजपासाठी सर्वात सुरक्षित असा मतदारसंघ मानला जातो. विद्यमान मुख्यमंत्र्याला अशाप्रकारे ईडीने ताब्यात घेतल्यामुळे हा लोकशाहीवरचा हल्ला असल्याची टीका विरोधकांनी केली आहे. या टीकेला उत्तर देत असताना भाजपाचे नेते, उत्तर मुंबईचे खासदार गोपाळ शेट्टी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही ईडीकडून चौकशी झाली असल्याचा किस्सा सांगितला.

# पंतप्रधान मोदी भूतानच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित

## मोदींना भूतानचा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन त्यांचा गौरव

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दोन दिवसीय भूतान दौऱ्यावर आहेत. यावेळी भूतानच्या महाराजांनी मोदींना भूतानचा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. 'ऑर्डर ऑफ द ड्रुक ग्यालपो' हा पुरस्कार प्राप्त करणारे पंतप्रधान मोदी हे प्रथम बिगर भूतानी नागरिक आहेत. या पुरस्काराचे भूतानमध्ये अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.**



समाजासाठी दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात येत असतो. या पुरस्काराची सुरुवात केल्यापासून आतापर्यंत केवळ चार मान्यवारांना पुरस्कार प्रदान केला गेला आहे. पंतप्रधान मोदींना आतापर्यंत १५ देशांचा सर्वोच्च नागरि पुरस्कार प्राप्त झालेला आहे.या पुरस्कारानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, "हा सन्मान माझ्या एकट्याचा नसून भारतातील १४० कोटी भारतीयांचा सन्मान आहे. सर्व भारतीय नागरिकांच्या वतीने भूतानच्या या महान भूमीतील हा पुरस्कार मी नम्रपणे स्वीकारतो.

### मोदी हे दोन दिवसीय भूतान दौऱ्यावर

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, जेव्हा संपूर्ण विश्व वातावरण बदलाच्या आव्हानाचा सामना करत आहे, तेव्हा भूतानमध्ये कार्बन उत्सर्जन कमी केले जात आहे. भूतानची याबाबत झालेली प्रगती जगाला दिशा देणारी आहे. भारत आणि भूतानमधील युवकांच्या महत्त्वाकांक्षा सारख्याच आहेत. भारताने २०४७ साली विकसित राष्ट्र म्हणून पुढे येण्याचे उद्दिष्ट निर्धारित केले आहे. तर भूतानने २०३४ पर्यंत उच्च उत्पन्न गटातील देश बनण्याचा संकल्प केला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दोन दिवसीय भूतान दौऱ्यावर आहेत. यावेळी भूतानच्या महाराजांनी मोदींना भूतानचा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.

तसेच या सन्मानासाठी भूतानचे आभार मानतो."भूतानची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी भारत सदैव तुमच्यापाठिशी आहे. बीबी म्हणजेच ब्रँड भूतान आणि भूतान बिलिव्ह या संकल्पनांना भारताचा पाठिंबा असेल. मी खात्रीने सांगतो की, आगामी पाच वर्षांत भारत या संबंधांना नवी ऊर्जा मिळेल. दळणवळण, पायाभूत सुविधा, व्यापार आणि ऊर्जा क्षेत्रात संधी निर्माण करण्यासाठी आपण एकत्र काम करू", असेही पंतप्रधान यावेळी म्हणाले.

# अनुष्का अकायबरोबर भारतात परतणार?

अभिनेत्री अनुष्का शर्मा आणि क्रिकेटर विराट कोहलीने १५ फेब्रुवारीला त्यांच्या दुसऱ्या मुलाचं म्हणजेच अकायचं स्वागत केलं. अनुष्का सध्या अकायबरोबर लंडनमध्ये राहत आहे आणि विराट त्याच्या आयपीएलच्या सामन्यासाठी भारतात सज्ज झाला आहे. आजपासून आयपीएल सुरू झाली आहे आणि आजच्या पहिला सामन्यात चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हे दोन बहुचर्चित संघ आमनेसामने येणार आहेत. विराट भारतात परतल्याने त्याचे असंख्य चाहते त्याची मॅच पाहण्यास उत्सुक आहेत. तसेच अनुष्का तिच्या पतीला सपोर्ट करण्यासाठी भारतात येणार का? याचीसुद्धा चाहते आतुरतेने वाट पाहतायत.बॉलीवूड लाईफच्या माहितीनुसार, आयपीएल दरम्यान अनुष्का भारतात परत येण्याची शक्यता आहे. अकाय आता दीड महिन्यांचा होईल आणि जन्माच्या एक महिन्यानंतर नवजात मुलांना बहुतेक विमानाने प्रवास करण्याची परवानगी दिली जाते. अकाय सध्या त्याची आई अनुष्का आणि बहीण वामिका कोहलीसह लंडनमध्ये राहतोय.विराटच्या सामान्यादरम्यान अनुष्का नेहमी त्याला सपोर्ट करत आली आहे. आजपर्यंत असं कधीचं झालं नाही की विराटचा सामना आहे आणि अनुष्काची तिथे हजेरी नाही. म्हणूनचं या आयपीएलच्या या सामन्यांमध्ये अनुष्का कधीही भारतात परतेल अशी शक्यता वर्तविली जात आहे. दुसऱ्या प्रेग्नेंसीदरम्यानसुद्धा गुप्तता पाळत अनुष्काने विराटच्या सामन्यांना हजेरी लावली आहे. दरम्यान, अनुष्का शर्मा आणि विराट कोहली यांनी २०१८ मध्ये लग्नगाठ बांधली. लग्नाच्या दोन वर्षांनंतर या कपलने २०२१ मध्ये त्यांची पहिली मुलगी वामिकाचं स्वागत केलं. तर फेब्रुवारी २०२४ मध्ये त्यांनी अकायच्या जन्माची गुड न्यूज दिली. अनुष्का सध्यातरी बॉलिवूडमध्ये कमबॅक करणार नसल्याची शक्यता वर्तवली जात आहे. २०१८ मध्ये शाहरुख खान आणि कतरिना कैफबरोबर अनुष्का 'झिरो'मध्ये शेवटची दिसली होती.अभिनेत्री अनुष्का शर्मा आणि क्रिकेटर विराट कोहलीने १५ फेब्रुवारीला त्यांच्या दुसऱ्या मुलाचं म्हणजेच अकायचं स्वागत केलं. अनुष्का सध्या अकायबरोबर लंडनमध्ये राहत आहे आणि विराट त्याच्या आयपीएलच्या सामन्यासाठी भारतात सज्ज झाला आहे. आजपासून आयपीएल सुरू झाली आहे आणि आजच्या पहिला सामन्यात चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हे दोन बहुचर्चित संघ आमनेसामने येणार आहेत. विराट भारतात परतल्याने त्याचे असंख्य चाहते त्याची मॅच पाहण्यास उत्सुक आहेत. तसेच अनुष्का तिच्या पतीला सपोर्ट करण्यासाठी भारतात येणार का? याचीसुद्धा चाहते आतुरतेने वाट पाहतायत.बॉलीवूड लाईफच्या माहितीनुसार, आयपीएल दरम्यान अनुष्का भारतात परत येण्याची शक्यता आहे. अकाय आता दीड महिन्यांचा होईल आणि जन्माच्या एक महिन्यानंतर नवजात मुलांना बहुतेक विमानाने प्रवास करण्याची परवानगी दिली जाते.

# उर्वशी राजकारणात एन्ट्री करणार



काही दिवसांपूर्वीच लोकसभा निवडणुकांचं बिगुल वाजलं. त्यामुळे सध्या सत्ताधारी व विरोधकांच्या प्रचाराचा धडाका सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत सर्वच पक्षांमध्ये चुरशीची होणार आहे. अशातच एका बॉलीवूडच्या बोल्ड व हॉट अभिनेत्रीची असल्याचं समोर आलं आहे. या अभिनेत्रीने स्वतः एक मोठं विधान केलं आहे. राजकारणात प्रवेश करू इच्छिणारी बॉलीवूडची बोल्ड व हॉट प्रसिद्ध अभिनेत्री म्हणजे उर्वशी रौतेला. 'हेट स्टोरी ४', 'ग्रेट गँड मस्ती', 'सनम रे' आणि 'वर्जिन भानुप्रिया' यांसारख्या चित्रपटात काम करून आता उर्वशीला इंडस्ट्रीत ११ वर्ष पूर्ण झालं आहे. अभिनय, सौंदर्याच्या जोरावर उर्वशीनं बॉलीवूडमध्ये स्वतःची ओळख निर्माण केली आहे. आता अभिनेत्री राजकारणात पाऊल ठेवण्यासाठीही तयार असल्याचं समोर आलं आहे.'इंस्टंट बॉलीवूड'शी संवाद साधताना उर्वशीला विचारलं की, तुला राजकारणात किती रस आहे? तू राजकारणातल्या घडामोडींना फॉलो करते का? यावर अभिनेत्री म्हणाली, "मला आधीच तिकिट मिळालं आहे. त्यामुळे मला आता निर्णय घ्यायचा आहे की, राजकारणात भाग घेऊ की नको? मी अजूनपर्यंत काही ठरवलं नाहीये. त्यामुळे मला चाहत्यांनी सांगा, राजकारण प्रवेश करू की नको?"उर्वशीचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतं आहे.

# अंकिता लोखंडे पापाराझींवर भडकली

'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपट आज (२२ मार्च रोजी) चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. रणदीप हुड्डा अभिनीत या चित्रपटात अंकिता लोखंडेने महत्त्वाची भूमिका साकारली आहे. गुरुवारी संध्याकाळी कलाकारांसाठी या चित्रपटाचं स्पेशल स्क्रीनिंग आयोजित करण्यात आलं होतं. अनेक कलाकार या कार्यक्रमाला उपस्थित होते. अलीकडेच 'बिग बॉस'मध्ये झळकलेल्या अंकिताने शोमधील काही स्पर्धकांना या स्क्रीनिंगसाठी बोलावलं होतं. 'बिग बॉस'मधील स्पर्धक अभिषेक कुमार आणि फिरोजा (खानजादी) यांच्याबरोबर अंकिता लोखंडेने या स्क्रीनिंगला उपस्थिती दर्शवली होती. या तिघांना एकत्रित चित्रपटगृहात जाताना पाहून पापाराझी त्यांच्या मागे मागे गेले. काही जण म्हणाले, "चला चला आत जाऊ." पापाराझी आत जाणार तेवढ्यातच अंकिताने त्यांना अडवलं आणि म्हणाली, "तुम्ही बाहेर निघा, आत चित्रपट सुरू आहे आणि तुम्ही असे आत येताय, हे तुम्ही खूप चुकीचं करताय; थोडं तरी भान राखा."अंकिताचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. या व्हिडीओत अंकिता पापाराझींवर भडकताना दिसली. "अंकिता बरोबर बोलतेय", "अंकिता तिच्या जागेवर योग्य आहे", अंकिताची बाजू मांडत चाहत्यांनी अशा कमेंट्स केल्या आहेत.दरम्यान, अंकिताच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर अंकिताचा चित्रपट 'स्वातंत्र्यवीर सावरकर' आज (२२ मार्च) प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. हा चित्रपट विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनावर आधारित आहे. या चित्रपटात अंकिताने वीर सावरकरांच्या पत्नीची भूमिका साकारली आहे.



# आत्याने घेतली सारा अली खानची बाजू

सारा अली खानच्या 'ए वतन मेरे वतन' चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा चालू आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून स्वातंत्र्यपूर्व काळातील कथा रुपेरी पडद्यावर मांडण्यात आली आहे. हा चित्रपट उषा मेहता यांचा बायोपिक असून यामध्ये सारा अली खान प्रमुख भूमिका साकारताना पाहायला मिळत आहे. २१ मार्चला हा चित्रपट अमेझॉन प्राईमवर प्रदर्शित झाला. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर काहींनी चित्रपटाचं कौतुक केलं पण बऱ्याच लोकांनी साराच्या अभिनयावर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण केलं आहे. या चित्रपटातील साराच्या अभिनयावर बऱ्याच लोकांनी टीका केली आहे. बऱ्याच समीक्षकांनीही साराच्या कामावर प्रश्नचिन्ह उभं केलं आहे. या भूमिकेसाठी लागणारे गांभीर्य साराच्या कामातून दिसत नसल्याची बऱ्याच लोकांनी तक्रार केली. आता साराची आत्या सबा पतौडी हिने साराची बाजू घेत तिच्या टीकाकारांना उत्तर दिलं आहे. याआधी साराचा 'मर्डर मुबारक' हा चित्रपटही नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला अन् यातही सारा प्रेक्षकांवर छाप पाडण्यात अपयशी ठरली.करण जोहरने साराच्या 'ए वतन मेरे वतन' चित्रपटाचं नुकतंच कौतुक केलं. आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर करणने या विषयी पोस्ट केली अन् त्याच्या पोस्टवर बऱ्याच लोकांनी कमेंट्स करत साराच्या अभिनयावर टीका केली. त्यांना साराची आत्या सबा पतौडी यांनी उत्तर दिलं आहे. सबा यांनी आपल्या कमेंटमध्ये लिहिलं, "जोपर्यंत तुम्ही पहिल्यांदा एखादी कलाकृती बघत नाही तोवर तुम्ही त्याबद्दल मत देणं योग्य नाही. सारा ही खरोखर हुशार आहे! माशाअल्लाह."साराच्या या चित्रपटाची कथा दरब फारूकी यांनी लिहिली आहे आणि कन्नन अय्यर यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. या चित्रपटात सारा अली खानसह स्पर्श श्रीवास्तव, इमरान हाश्मी, आनंद तिवारी यांच्यासारखे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. चित्रपटाच्या कथेची, मांडणीची बऱ्याच लोकांनी प्रशंसा केली असली तरी साराच्या कामावर प्रेक्षक मात्र नाराज असल्याचं त्यांच्या प्रतिक्रियेवरुन स्पष्ट होत आहे.

# चेन्नई सुपर किंग्सची विजयी सलामी

## मुस्तफिझूर रहमान विजयाचा शिल्पकार

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**शिवम दुबेच्या इम्पॅक्ट पाडणाऱ्या तुफान खेळीसह चेन्नई सुपर किंग्सचा पहिल्याच सामन्यात ६ विकेट्सने मोठा विजय नोंदवला आहे. १९ व्या षटकात २ चौकार आणि एका षटकारासह शिवम दुबेने चेन्नईला सहज विजय मिळवून दिला. जडेजा आणि दुबेची भागीदारी महत्त्वपूर्ण ठरली मुस्तफिझूर रहमान हा चेन्नईच्या विजयाचा शिल्पकार ठरला. त्याने गोलंदाजी करताना ४ विकेट्स घेत आरसीबीच्या फलंदाजांना वेसण घातले.**



चेन्नईच्या फलंदाजांनी चांगली फलंदाजी केली पण त्यांनी ठरावीक अंतराने विकेट गमावल्या. प्रत्येक खेळाडूने फलंदाजी करत संघाच्या धावांमध्ये आपले योगदान दिले. इम्पॅक्ट प्लेअर म्हणून आलेल्या शिवम दुबेने पुन्हा एकदा प्रभावी फलंदाजी केली. तर जडेजाने त्याला साथ देत काही मोठे फटके खेळले. १८ चेंडूत १८ धावा असा अटीतटीचा सामना सुरू असताना शिवम दुबेने दोन चौकार लगावत चेन्नईला विजयाच्या अधिक जवळ आणले. शिवम दुबेने २८ चेंडूत १ षटकार आणि ४ चौकारांसह ३७ धावा केल्या, तर जडेजाने १७ चेंडूत एका षटकारासह २५ धावा केल्या.चेन्नईकडून मिळालेल्या १७४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नवा कर्णधार ऋतुराज गायकवाडने सिराजच्या गोलंदाजीवर चौकार मारत दणदणीत सुरूवात केली. ऋतुराजसोबत सलामीसाठी रचिन रवींद्र आला. झटपट धावा करणारा ऋतुराज १५ धावा करत झेलबाद झाला. त्याच्यानंतर रचिनने शानदार फटके खेळत संघाचा डाव पुढे नेला. पण कर्ण शर्माच्या गोलंदाजीवर तो ३ षटकार आणि ३ चौकारांसह ३७ धावा करत बाद झाला. यानंतर डॅरिल मिचेल (२७) आणि अजिंक्य रहाणे (२२) जबरदस्त फलंदाजी करत होते पण फार काळ मैदानात टिकू शकले नाहीत. शिवम दुबेला इम्पॅक्ट प्लेअर म्हणून फलंदाजीसाठी उतरला. तर त्याच्यासोबत जडेजा संघाचा डाव सावरला आणि थेट विजय मिळवूनच तंबूत परतले. प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सीएसकेचा नवा गोलंदाज मुस्तफिझूर रहमान गोलंदाजीला येईपर्यंत बंगळुरू संघाचा हा निर्णय त्यांच्यासाठी फायदेशीर ठरला. सलामीसाठी आलेल्या फॅफ डू प्लेसिसने संघाला जबरदस्त सुरूवात करून दिली. त्याने २३ धावांत ८ चौकार मारत ३५ धावा केल्या. पाचव्या षटकात मात्र आरसीबीच्या हातून सामना निसटत असल्याचे दिसले. मुस्तफिझूरच्या षटकात फॅफ (३५) आणि रजत पाटीदार (०) झेलबद झाले. पुढच्याच षटकात चहरने मॅक्सवेलला खाते न उघडताच धोनीकडून झेलबाद केले.या मोठ्या धक्क्यांनंतर विराट कोहली (२१) आणि कॅमेरून ग्रीन (१८) हे दोघे संघाचा डाव सावरत होते.पण मुस्तफिझूरने त्यांना बराच काळ मैदानात टिकू दिले नाही. १२व्या षटकात विराटला झेलबाद करताना रचिन आणि रहाणेने अफलातून झेल टिपला. तर त्याच षटकात चौथ्या चेंडूवर ग्रीनला क्लीन बोल्ड केले. या विकेटनंतर आरसीबी संघ पूर्णपणे कोलमडला असे वाटले, पण नंतर आलेल्या दिनेश कार्तिक आणि अनुज रावत यांनी ५ बाद ७९ धावांपासून १७३ धावसंख्येपर्यंत पोहोचवला. अनुज रावतने सामन्याचा रोख बदलत २५ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटाकारांच्या मदतीने ४८ धावा केल्या. पहिला डाव संपल्याने त्याचे अर्धशतक हुकले पण संघासाठी निर्णायक क्षणी महत्त्वाची इनिंग तो खेळला. तर दिनेश कार्तिकसुध्दा मोक्याच्या वेळी पुन्हा एकदा संघासाठी संकटमोचक ठरला.

### रचिनने शानदार फटके

चेन्नईच्या फलंदाजांनी चांगली फलंदाजी केली पण त्यांनी ठरावीक अंतराने विकेट गमावल्या. प्रत्येक खेळाडूने फलंदाजी करत संघाच्या धावांमध्ये आपले योगदान दिले. इम्पॅक्ट प्लेअर म्हणून आलेल्या शिवम दुबेने पुन्हा एकदा प्रभावी फलंदाजी केली. तर जडेजाने त्याला साथ देत काही मोठे फटके खेळले. १८ चेंडूत १८ धावा असा अटीतटीचा सामना सुरू असताना शिवम दुबेने दोन चौकार लगावत चेन्नईला विजयाच्या अधिक जवळ आणले. शिवम दुबेने २८ चेंडूत १ षटकार आणि ४ चौकारांसह ३७ धावा केल्या, तर जडेजाने १७ चेंडूत एका षटकारासह २५ धावा केल्या. चेन्नईकडून मिळालेल्या १७४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नवा कर्णधार ऋतुराज गायकवाडने सिराजच्या गोलंदाजीवर चौकार मारत दणदणीत सुरूवात केली. ऋतुराजसोबत सलामीसाठी रचिन रवींद्र आला. झटपट धावा करणारा ऋतुराज १५ धावा करत झेलबाद झाला. त्याच्यानंतर रचिनने शानदार फटके खेळत संघाचा डाव पुढे नेला.

---

# चार दिवसांपूर्वी स्ट्रेचरवर, आज चेन्नईचा हिरो

## मुस्ताफिझूरच्या गोलंदाजीसमोर आरसीबीने टेकले गुडघे

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चेन्नई सुपर किंग्जचा नवा वेगवान गोलंदाज मुस्ताफिझूर रहमानने इंडियन प्रीमियर लीग २०२४ च्या पहिल्या सामन्यात धुव्वा उडवला. ४ दिवसांपूर्वी स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर गेलेला मुस्ताफिझूर पहिल्याच सामन्यात धोनीच्या संघासाठी हिरो ठरला. CSK कडून मुस्ताफिझूरने आपल्या चार षटकांमध्ये फक्त ३० धावा देत ४ मोठ्या विकेट घेतल्या. मुस्ताफिझूर त्याच्या पहिल्या स्पेलमध्ये इतका प्रभावी ठरला की विराट कोहली आणि फाफ डुप्लेसिस धावा काढण्यासाठी आठोकाठ प्रयत्न करताना दिसले.**





पहिल्या स्पेलमध्ये मुस्तफिझूरने दोन षटकांत ७ धावा देऊन ४ बळी घेतले होते.मुस्तफिझूरला दुसऱ्या स्पेलमध्ये विकेट मिळाली नाही, पण त्याने ज्या पद्धतीने गोलंदाजी केली त्यामुळे आरसीबीचे खेळाडू शॉट मारताना विचार करत होते. मुस्तफिझूरने आपल्या गोलंदाजीने फाफ डुप्लेसिस, विराट कोहली, कॅमेरून ग्रीन आणि रजत पाटीदार यांच्या विकेट घेतल्या. मुस्तफिझूरने आरसीबीच्या मजबूत फलंदाजी फळीला आपल्या गोलंदाजीवर नाचवले.मुस्तफिझूर रहमान हा बांगलादेशचा वेगवान गोलंदाज नुकताच श्रीलंकेविरुद्धच्या तिसऱ्या वनडे सामन्यात त्याला स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर नेण्यात आले. खरेतर मैदानावर गोलंदाजी करताना त्याला संपूर्ण शरीरात क्रॅम्प आले होते. मुस्तफिझूरला मैदानाबाहेर जाण्यासाठी पायी चालत जाणेही शक्य नव्हते,अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्याला स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर नेण्यात आले. पण चांगली गोष्ट म्हणजे मुस्तफिझूर खेळण्यासाठी फिट झाला आणि तो आयपीएलमध्ये सीएसकेसाठी पूर्णपणे तंदुरुस्त होऊन परतला. मुस्तफिझूर रहमानच्या घातक गोलंदाजीतून सावरल्यानंतर, दिनेश कार्तिक आणि अनुज रावत यांच्या दमदार फलंदाजीमुळे आरसीबी संघाला २० षटकांत ६ बाद १७३ धावा करण्यात यश आले. आरसीबीसाठी अनुजने अवघ्या २५ चेंडूत ४८ धावा केल्या.

### 30 धावा देत 4 मोठ्या विकेट

या खेळीत त्याने ४ चौकार आणि ३ षटकारही मारले. याशिवाय दिनेश कार्तिकने २६ चेंडूत ३८ धावांची दमदार खेळी केली. कार्तिकने आपल्या खेळीत ३ चौकार आणि २ षटकार मारले. चेन्नई सुपर किंग्जचा नवा वेगवान गोलंदाज मुस्ताफिझूर रहमानने इंडियन प्रीमियर लीग २०२४ च्या पहिल्या सामन्यात धुव्वा उडवला. ४ दिवसांपूर्वी स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर गेलेला मुस्ताफिझूर पहिल्याच सामन्यात धोनीच्या संघासाठी हिरो ठरला. CSK कडून मुस्ताफिझूरने आपल्या चार षटकांमध्ये फक्त ३० धावा देत ४ मोठ्या विकेट घेतल्या. मुस्ताफिझूर त्याच्या पहिल्या स्पेलमध्ये इतका प्रभावी ठरला की विराट कोहली आणि फाफ डुप्लेसिस धावा काढण्यासाठी आठोकाठ प्रयत्न करताना दिसले.